महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दूरध्वनीक्र. २६३८३००१/२६३८३०१६
Email ID: ddadm.des@hotmail.com
dydiradm.des@maharashtra.gov.in

क्रमांक: नाभप्र/अवसांसं/कागदपत्र पडताळणी/२०२४/१२३/प्रशा-२/८३६ दिनांक: १२/०७/२०२४

प्रति,
RAHUL GANPATI PATIL,
AT HIRAWADE KHALASA,
POST HASUR DUMALA,
TAL KARVEER, KOLHAPUR – ४१६००१

**विषय** – सांख्यिकी सहायक, गट – क या पदासाठी कागदपत्र पडताळणीबाबत.

महोदय / महोदया,

विषयांकीत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, दिनांक २०/१०/२०२३ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारावर निवडसूची / अतिरीक्त निवडसूची तयार करण्याकरीता **सांख्यिकी सहायक, गट – क** पदासाठी प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी आपली शिफारस करण्यात आली आहे. तरी खाली दिलेल्या दिनांकास व वेळेस दिलेल्या पत्त्यावर कागदपत्रे पडताळणीसाठी उपस्थित रहावे.

| | |
|---|---|
| **दिनांक –** | २२/०७/२०२४ |
| **वेळ –** | सकाळी १०-३० वाजता. |
| **प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी उपस्थित रहावयाचे ठिकाण –** | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. |

**<u>सूचना</u>**

२. कागदपत्र पडताळणी वेळी उमेदवाराने लागू असतील त्याप्रमाणे खाली नमूद **मूळ व साक्षांकित (ATTESTED) प्रमाणपत्रे** सोबत आणावीत. तसेच उमेदवारांनी ओळख पटविण्यासाठी स्वत:चे छायाचित्र असणारे **वैध ओळखपत्र** सोबत आणावे.

१. ऑनलाईन अर्जाची प्रत व परीक्षा शूल्क भरल्याबाबतची पावती.
२. स्वत:चे अलिकडच्या काळातील पारपत्र आकाराचे व ऑनलाईन अर्जाशी जुळणारे छायाचित्र.
३. पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता / अर्हता याबाबतची प्रमाणपत्रे व परीक्षेची गुणपत्रिका
४. अर्जात नमूद केल्यानुसार उच्चतम शैक्षणिक अर्हता धारण केली असल्यास सदर शैक्षणिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे.

५. शाळा सोडल्याचा दाखला.

६. मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र.

७. विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र, इमाव या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीत नमूद केल्यानुसार सक्षम अधिकाऱ्याचे वैध प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र)

८. माजी सैनिक आरक्षणाअंतर्गत अर्ज केल्यास सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र.

९. अंशकालिन उमेदवार आरक्षणाअंतर्गत अर्ज केल्यास सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र.

१०. विहित नमुन्यातील राष्ट्रीय व राज्य स्तरावरील खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे खेळाडू प्रमाणपत्र (फक्त खेळाडूंसाठी राखीव पदांकरीता)

११. प्रकल्पग्रस्त आरक्षणाअंतर्गत अर्ज केल्यास सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र.

१२. भुकंपग्रस्त आरक्षणाअंतर्गत अर्ज केल्यास सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र.

१३. दिव्यांग आरक्षणाअंतर्गत अर्ज केल्यास दिव्यांग असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र.

१४. अनाथ आरक्षणाअंतर्गत अर्ज केल्यास अनाथ असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले अनाथ प्रमाणपत्र.

१५. शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने सादर केलेल्याची प्रत.

१६. प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने निर्गमित केलेले राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र.

१७. रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.

१८. संगणक अर्हता प्रमाणपत्र.

१९. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/(२०००)/१२, दि.२८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि. ०१/०७/२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे परिशिष्ट-अ मधील विहित नमुन्यातील प्रमाणपत्र भरून देणे आवश्यक राहील.

३. संचालनालयाची संवर्गावरील पदे राज्यस्तरीय असल्याने निवड होणा-या उमेदवाराची नियुक्ती संचालनालयाच्या नियुक्ती प्राधिकाराखाली असलेल्या राज्यातील कोणत्याही कार्यालयात उपलब्ध असलेल्या रिक्त पदावर करण्यात येईल.

४. उपरोक्त प्रक्रियेसाठी उमेदवाराने सर्व मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रांसह वेळापत्रकानुसार स्वत: उपस्थित राहणे बंधनकारक आहे. कोणत्याही कारणास्तव उमेदवाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तीस प्रमाणपत्र पडताळणीकरीता उपस्थित राहता येणार नाही.

५. कागदपत्र पडताळणीच्या वेळी पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करत नसल्याचे आढळून आल्यास उमेदवारास अपात्र समजण्यात येईल.

६. हे पत्र म्हणजे शिफारस पत्र अथवा नियुक्ती पत्र नाही याची नोंद घ्यावी.

(नि. म. प्रभुदेसाई)
उपसंचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.